**महत्वाचे / कालमर्यादित**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र.लेखा/५/आयकर/१५५/२०१४
दिनांक :- ३०/०१/२०१४

**विषय :- आयकर फॉर्म क्र. २४ Q त्रैमासिक अहवाल व मासिक आयकर कपात सादर करणेबाबत......**
**संदर्भ :- परिपत्रक क्र.लेखा/५/आयकर/२२९४/२०१३, दि.१५/०६/२०१३**

**परिपत्रक,**

लेखा विभागातील संदर्भिय परिपत्रकान्वये प्रत्येक आहरण - वितरण अधिकारी यांना इटीडीएस मध्ये **नमुना २४ Q** कालमर्यादेत विवरणपत्रे भरण्याची दक्षता घ्यावी व पगारातून कपात केलेल्या आयकर धनादेश तारखेपासून ७ दिवसांच्या आत भरणेकामी कळविण्यात आले आहे.

तथापि संबंधित आहरण - वितरण अधिकारी इटीडीएस सादर करताना आयकर विभागास खाली नमूद केलेप्रमाणे विविध प्रकारच्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) आयकर कपात करणा-याचे चुकीचे किंवा अवैध पॅन नमूद करणे.
२) आहरण - वितरण अधिका-यांचे टॅन नमूद न करणे.
३) चलनामध्ये चुकीचे कलम व निधारण वर्ष नमूद करणे.
४) बी.एस.आर. कोड चुकीचे नमूद करणे.
५) इटीडीएस विवरण पत्रातील रकाने योग्यपणे न बनविणे, योग्य त्या रकान्यात कपात कमी किंवा न करण्याबद्दल संबंधित आयकर अधिका-यांच्या प्रमाणपत्राचा उल्लेख न करणे.
६) नमुना २४ Q भरताना **Type of Payee** ची माहिती चौथ्या त्रैमासिकात न भरणे व विहीत मुदतीत सादर न करणे.
७) मासिक आयकर कपातीचे धनादेश ७ दिवसात न भरणे.

उपरोक्त त्रुटी वारंवार होत असलेने त्या टाळणेकामी सर्व आहरण-वितरण अधिकारी यांना परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, वैयक्तीक लक्ष देवून संबंधित पगारबिल लिपीक / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. या संदर्भात आयकर विभागाकडून दंडात्मक स्वरुपाची कोणतीही कारवाई झाल्यास संपूर्ण जबाबदारी आहरण - वितरण अधिकारी यांची राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

**प्रति :-**

१) सर्व संबंधित आहरण - वितरण अधिकारी/ विभाग प्रमुख
------------------------- विभाग